# नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस भरती-2016

1. 5, 2 व 9 यापैकी प्रत्येक अंक एकदाच वापरून तयार होणारी सर्वात मोठी संख्या व सर्वात लहान संख्या यातील फरक सांगा.
   1) 646 2) 656 3) 693 4) 676
2. x ही विषम संख्या आहे, तर खालीलपैकी सम संख्या कोणती?
   1) 2 x +1 2) 3 x -1 3) 3 x 4) 2 x -1
3. [2/5 x 10/3 x 3/6 x 3/8 x 2 ] / 1/22 = x तर x =
   1) 1/22 2) 60/11 3) 11/60 4) 22
4. गावातील यात्रेनिमित्त गावकऱ्यांनी मंदिरासभोवतालच्या 11 झाडांवरती प्रत्येकी 11 झेंडे लावले होते. वादळामुळे झाडांवरील प्रत्येकी 8 झेंड व तीन झाडावरील सर्व झेंडे पडले, तर झाडांवर एकूण किती झेंडे शिल्लक राहिले?
   1) 16 2) 22 3) 24 4) 26
5. 9/10, 11/12, 5/6 व 7/8 यापैकी लहान संख्या कोणती?
   1) 5/6 2) 11/12 3) 7/8 4) 9/10
6. रमेशने आपल्या पगाराच्या 4/5 रक्कम घरखर्चासाठी, 1/8 रक्कम प्रवासासाठी खर्च केली तेव्हा त्याच्याजवळ 3600 रूपये शिल्लक राहिले, तर त्याचा पगार किती?
   1) 46000 रू 2) 48000 रू 3) 52000 रू 4) 44000 रू
7. 10.2 किलोग्रॅम गव्हाचे 17 समान भाग केले, तर प्रत्येक भागातील गव्हाचे वजन किती?
   1) 0.6 ग्रॅम 2) 60 ग्रॅम 3) 600 ग्रॅम 4) 6 ग्रॅम
8. 48 मीटर व 80 मीटर लांब मापाचे दोन दोरखंड आहेत. त्यांचे जास्तीत जास्त लांबीचे परंतु समान मापाचे तुकडे करायचे आहेत, तर प्रत्येक तुकड्याची लांबी किती ठेवावी?
   1) 8 मीटर 2) 4 मीटर 3) 16 मीटर 4) 32 मीटर
9. जर $2x^2 = \sqrt{1024}$ तर x = ?
   1) 16 2) 32 3) 8 4) 4
10. $\sqrt{0.09} + \sqrt{0.49}$ = किती?
    1) 0.73 2) 1 3) 0.37 4) 0.703
11. $4^2 \times 4^1 \times 4^0$ = ?
    1) 64 2) 0 3) 16 4) 4
12. खुर्ची व टेबल यांच्या किंमतीचे गुणोत्तर 3:7 आहे, जर टेबलाची किंमत 441 रू. आहे, तर खुर्चीची किंमत किती?
    1) 252 रू 2) 315 रू 3) 189 रू 4) 126 रू

**13.** 300 रू. प्रति किलो असणाऱ्या काजूची किंमत वाढून प्रति किलो 360 रू. झाली, तर काजूच्या किंमतीमध्ये किती टक्के वाढ झाली?
1) 60% 2) 20% 3) 30% 4) 40%

**14.** एका शाळेत सन 2015 मध्ये 1000 विद्यार्थी होते, जर प्रत्येक वर्षी शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या 20% ने वाढत असेल तर सन 2017 मध्ये त्या शाळेत किती विद्यार्थी असतील?
1) 1240 2) 1400 3) 1200 4) 1440

**15.** एका परीक्षेत 25% विद्यार्थी इंग्रजीत अनुत्तीर्ण झाले. 20% विद्यार्थी गणितात अनुत्तीर्ण झाले व दोन्ही विषयात 15% विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले, तर त्या परीक्षेत किती टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले?
1) 50% 2) 30% 3) 70% 4) 60%

**16.** एक सायकल 1200 रूपयाला विकली तेव्हा 20% नफा झाला, तर त्या सायकलची मुळ किंमत किती?
1) 1000 रू 2) 800 रू 3) 900 रू 4) 1100 रू

**17.** 16, 44, 24, 12, 8 व 22 या संख्यांची सरासरी किती?
1) 18 2) 24 3) 23 4) 21

**18.** 18 पेनांची किंमत 270 रू आहे. तर 12 पेनांची किंमत किती?
1) 160 रू 2) 180 रू 3) 150 रू 4) 170 रू

**19.** एक स्कूटर 5 लिटर पेट्रोलवर 280 किमी एवढे अंतर कापू शकते, तर 224 किमी अंतर कापण्यासाठी किती पेट्रोल लागेल?
1) 4.5 लिटर 2) 4 लिटर 3) 3.5 लिटर 4) 4.75 लिटर

**20.** 40 मजूर 60 दिवसात 30 खंदक खणतात, तर 20 मजुरांना 15 खंदक खणण्यास किती दिवस लागतील?
1) 60 दिवस 2) 50 दिवस 3) 30 दिवस 4) 40 दिवस

**21.** ताशी 45 किमी वेगाने जाणारी एक मोटारसायकल एक पूल 20 सेकंदात पार करते, तरत्या पुलाची लांबी किती?
1) 900 मीटर 2) 350 मीटर 3) 250 मीटर 4) 225 मीटर

**22.** $(2/3)^0$ या घातांकित संख्येची किंमत किती?
1) 0 2) 2 3) 3 4) 1

**23.** जर x म्हणजे +, / म्हणजे -, - म्हणजे x, + म्हणजे / जर 7x 4 - 5+5/5=?
1) 5 2) 6 3) 7 4) 4

**24.** बेरीज करा. 555.55+55.55+5405.55=?
1) 6116.55 2) 6016.55 3) 6016.65 4) 6016.45

25. $(a+b)^2 = ?$

1) $a^2+b^2$ 2) $2ab$ 3) $a^2+b^2+ab$ 4) $a^2+b^2+2ab$

26. **खालील शब्दांपैकी भाववाचक नाम नसलेला शब्द ओळखा.**

1) क्रूरता 2) लुच्चा 3) ओलावा 4) नम्रता

27. **जो येईल तो पाहील. या वाक्यातील जो-तो हे कोणत्या प्रकारचे सर्वनाम आहे?**

1) आत्मवाचक सर्वनाम 2) दर्शक सर्वनाम
3) पुरूषवाचक सर्वनाम 4) संबंधी सर्वनाम

28. **नागपुरी हा शब्द खालीलपैकी कोणत्या विशेषणानाचा प्रकार आहे?**

1) सार्वनामिक विशेषण 2) नामसाधित विशेषण
3) अव्ययसाधित विशेषण 4) धातुसाधित विशेषण

29. **खालीलपैकी अकर्मक क्रियापद असलेले वाक्य ओळखा.**

1) शरद आंबा खातो 2) पोलिसांनी चोराला पकडले
3) राधा मोठ्याने हसते 4) कालिदासाने नाटक लिहिले

30. **त्याने अभ्यास केला होता. या वाक्याचा काळ ओळखा.**

1) पूर्ण भूतकाळ 2) अपूर्ण भूतकाळ 3) पूर्ण भविष्यकाळ 4) अपूर्ण भविष्यकाळ

31. **नेहमी खरे बोलावे या वाक्यातील विध्यर्थी क्रियापदावरून कोणता बोध होतो?**

1) कर्तव्य 2) इच्छा 3) तर्क 4) योग्यता

32. **वारंवार हे कोणत्या प्रकारचे क्रियाविशेषण अव्यय आहे?**

1) स्थितीदर्शक 2) सातत्यदर्शक 3) आवृत्तीदर्शक 4) प्रश्नार्थक

33. **खालीलपैकी सामान्यनाम कोणते?**

1) चपळाई 2) महागाई 3) नवलाई 4) आमराई

34. **अबब, अरेच्या, बापरे ! ही कोणत्या प्रकारची अव्यये आहेत?**

1) केवलप्रयोगी अव्यये 2) शब्दयोगी अव्यये
3) क्रियाविशेषण अव्यये 4) उभयान्वयी अव्यये

35. **हजार रूपये म्हणजे पाचशेच्या दोन नोटा या वाक्यातील उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.**

1) कारणबोधक 2) स्वरूपबोधक 3) संकेतबोधक 4) उद्देशबोधक

36. **चा, ची, चे प्रत्यय कोणत्या विभक्तीचे आहेत?**

1) प्रथमा 2) पंचमी 3) षष्ठी 4) सप्तमी

37. **जननी या शब्दाचा विरूध्दलिंगी शब्द कोणता?**

1) जानकी 2) जानू 3) जॉनी 4) जनक

38. **खालीलपैकी एकवचनी नाम कोणते?**

1) ससा 2) जावा 3) विटा 4) तळी

**39. सत् + शिल या संधीविग्रहाची योग्य संधी शोधा.**

1) सत्शील 2) सच्छील 3) सतशील 4) सत्शिल

**40. चौकोन हा शब्द खालीलपैकी कोणत्या समासाचे उदाहरण आहे?**

1) मध्यमपदलोपी 2) समाहार द्वंद 3) कर्मधारय 4) बहुव्रीही

**41. आज उशिरा उजाडले या वाक्याचा प्रयोग ओळखा.**

1) भावे 2) अकर्मक कर्तरी 3) कर्मणी 4) सकर्मक कर्तरी

**42. तीन रस्ते एकत्र येतात ती जागा = .........?**

1) तट 2) तेढ 3) तवई 4) तिठा

**43. मितव्ययी म्हणजे काय?**

1) काटकसरीने राहणारा 2) कमी बोलणारा
3) कमी हसणारा 4) कमी खाणारा

**44. हाडाची काडे करणे या वाक्प्रचाराचा अर्थ काय?**

1) तब्येतीकडे दुर्लक्ष करणे 2) धास्ती घेणे 3) खूप कष्ट करणे 4) मरण पावणे

**45. एका माळेचे मणी या म्हणीचा योग्य अर्थ कोणता?**

1) सगळेच सारखे 2) शोभेची वस्तू 3) देहाप्रमाणे आहार 4) निरूपयोगी मनुष्य

**46. खालीलपैकी अशुध्द शब्द ओळखा.**

1) अनुसूया 2) असहाय्य 3) उल्लेखित 4) औचित्य

**47. खालील वाक्याच्या शेवटी कोणते विरामचिन्ह येईल?**
**मी लवकर उठतो**

1) उद्गारवाचक चिन्ह 2) प्रश्नचिन्ह 3) पूर्णविराम 4) यापैकी एकही नाही

**48. अभियान या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?**

1) अभिनय 2) आव्हान 3) मोहीम 4) अंतराळ

**49. चांगले काम करा या वाक्याचे नकारार्थी वाक्य कोणते?**

1) वाईट काम करू नका 2) वाईट काम करा
3) चांगले काम करू नका 4) यापैकी नाही

**50. भावार्थदीपिका हा ग्रंथ कोणी लिहिला?**

1) विनोबा भावे 2) महात्मा गांधी 3) संत एकनाथ 4) संत ज्ञानेश्वर

**51. खालीलपैकी भारताचे पंतप्रधान कोण आहेत?**

1) सुरेंद्र नरेंद्र रामराव मोदी 2) नरेंद्र दामोदरदास मोदी
3) नरेंद्र करमचंद मोदी 4) नरेंद्र पंडितरावदास मोदी

**52. डोनाल्ड ट्रॅम्प कोणत्या देशाशी संबंधित आहेत?**

1) भारत 2) नेपाळ 3) अमेरिका 4) पाकिस्तान

**53. ISIS काय आहे?**

1) इस्लामिक स्टेट ऑफ इराक अॅन्ड सिरीया
2) इस्लामिक स्टेट ऑफ इरान अॅन्ड रशिया
3) इस्लामिक स्टेट ऑफ इंडिया अॅन्ड सोमालिया
4) इस्लामिक स्टेट ऑफ इंडोनेशिया अॅन्ड इराक

**54. एफ-16 हे काय आहे?**
1) लढाऊ विमान 2) रणगाडा 3) बंदूक 4) जहाज

**55. एनईईटी (NEET) परीक्षा म्हणजे काय?**
1) राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा 2) जिल्हा पात्रता प्रवेश परीक्षा
3) राज्य पात्रता प्रवेश परीक्षा 4) आंतरराष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा

**56. पी.व्ही.सिंधू कोणत्या खेळाशी संबंधित आहे?**
1) क्रिकेट 2) फुटबॉल 3) बॅडमिंटन 4) कबड्डी

**57. खालीलपैकी भारतरत्न पुरस्कार कोणाला मिळाला नाही?**
1) सी.राजगोपालाचारी 2) डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन
3) डॉ.सी.व्ही.रमन 4) महात्मा गांधी

**58. महाराष्ट्रात उमरेड करांडला वाघ अभयारण्य कोणत्या जिल्हयात आहे?**
1) गडचिरोली 2) अमरावती 3) यवतमाळ 4) नागपूर

**59. तोतलाडोह धरण कोणत्या नदीवर आहे?**
1) भीमा 2) पंचगंगा 3) वैनगंगा 4) पेंच

**60. 2016 च्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा कोणत्या देशात होणार आहे?**
1) भारत 2) रशिया 3) ब्राझील 4) अमेरिका

**61. Micsoft Office Operating System मध्ये खालीलपैकी कोणता Program समाविष्ट नाही?**
1) Android 2) Exeel 3) Powerpoint 4) Word

**62. समोरची व्यक्ती खोटे बोलत आहे, हे तपासण्यासाठी खालीलपैकी कोणती चाचणी घेण्यात येते?**
1) Polygraph 2) Molygraph 3) Sysmography 4) Tolygraphy

**63. ऑस्कर 2016 चा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार कोणत्या चित्रपटाला मिळाला आहे?**
1) Spot Light 2) Skyfall 3) Star War 4) Gladiator

**64. 61 वा फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार कोणत्या चित्रपटाला मिळाला आहे?**
1) सैराट 2) इश्क 3) बाजीराव मस्तानी 4) डर

**65. प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत किती रकमेचे अपघाती विमा कवच देण्यात आले आहे?**
1) दोन लाख 2) तीन लाख 3) एक लाख 4) दहा लाख

**66. खालीलपैकी नुकतीच कोणाची निवड राष्ट्रपतींनी राज्यसभेकरिता केलेली आहे?**
1) प्रणव मुखर्जी 2) शरद पवार 3) महेंद्रसिंग धोनी 4) नरेंद्र जाधव

**67. पंचायत समितीचा कार्यकारी अधिकारी कोण असतो?**
1) मुख्य कार्यकारी अधिकारी 2) गटविकास अधिकारी
3) उपमुख्य कार्यकारी अधिकारी 4) उपमुख्य कार्यकारी अधिकारी

**68. इ.स.1935 मध्ये मोझरी येथे गुरूकुंज आश्रमाची स्थापना कोणी केली?**
1) महात्मा गांधी 2) विनोबा भावे 3) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज 4) डॉ.पंजाबराव देशमुख

**69. ठक्कर बाप्पा यांचे नाव कोणत्या क्षेत्राशी निगडीत आहे?**
1) आदिवासी कल्याण 2) पोलीस कल्याण 3) क्रीडा 4) तंत्रज्ञान

**70. भारताच्या घटना समितीचे अध्यक्ष कोण होते?**
1) डॉ.बाबासाहेब आंबेडकर 2) डॉ.राजेंद्र प्रसाद
3) पंडित जसराज 4) पंडित जवाहरलाल नेहरू

**71. सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर कॉटन रिसर्च (CICR) कोठे आहे?**
1) भंडारा 2) गोंदिया 3) नागपूर 4) वर्धा

**72. महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रफळ किती चौ.कि.मी आहे?**
1) 3,07,713 2) 4,07,713 3) 5,07,713 4) 2,07,713

**73. भारत हे .................... राष्ट्र आहे.**
1) धर्मनिरपेक्ष 2) धार्मिक 3) जातीयवादी 4) अधर्मी

**74. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बहुमत चाचणी कोणत्या राज्याच्या विधानसभेत काँग्रेस पक्षाने जिंकली?**
1) उत्तरप्रदेश 2) उत्तराखंड 3) राजस्थान 4) पंजाब

**75. कोणाच्या शिफारशीमुळे भारताच्या क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष शशांक मनोहर यांनी राजीनामा दिला आहे?**
1) शरद पवार समिती 2) अनुराग यादव समिती
3) महेंद्रसिंग धोनी समिती 4) लोढा समिती

**76. 2, 6, 12, 20, ?**
1) 20 2) 30 3) 40 4) 50

**77. एक घड्याळ आरशातून पाहिल्यास 4 वाजून 55 मिनिटे ही वेळ दर्शविते, तर प्रत्यक्षात ते घड्याळ कोणती वेळ दर्शवित आहे?**
1) 8 वा.55 मि. 2) 8वा. 05 मि. 3) 7 वा.55मि. 4) 7वा.05मि.

**78. समीरचे वय त्याच्या लहान बहिणीच्या वयाच्या तिप्पटीपेक्षा सहाने कमी आहे, समीरचे वय 21 वर्षे असेल तर त्याच्या लहान बहिणीचे वय किती?**
1) पाच वर्षे 2) नऊ वर्षे 3) तेरा वर्षे 4) पंधरा वर्षे

79. BALL = 27 तर MOON = ?

1) 55 2) 56 3) 57 4) 58

80. गटात न बसणारे अक्षर ओळखा. A, D, E, I, O, U

1) D 2) I 3) O 4) U

81. विद्यार्थ्यांच्या रांगेत विराटचा क्रमांक डावीकडून बारावा व उजवीकडून दहावा आहे, तर त्या रांगेत एकूण विद्यार्थी किती आहेत?

1) 20 2) 19 3) 21 4) 22

82. 12, 18, 27, 39, 54, ?

1) 62 2) 72 3) 82 4) 88

83. गटात न बसणारी संख्या ओळखा. 81, 121, 169, 225, 250

1) 81 2) 169 3) 225 4) 250

84.

| | | |
|---|---|---|
| 4 | 6 | 8 |
| 5 | 7 | 9 |
| 41 | 85 | ? |

1) 145 2) 17 3) 72 4) 89

85. विसंगत शब्द ओळखा.

1) दिल्ली 2) पॅरिस 3) न्यूयॉर्क 4) कोलंबो

86. AM, CO, EQ, ......., IU, KW

1) HT 2) FR 3) GS 4) VO

87. प्रश्नचिन्हाच्या जागी कोणता योग्य अंक येईल?

FACE : 6135 तर NOSE : ?

1) 1415195 2) 1141559 3) 1413112 4) 14121315

88. गणेशचा पगार सुनीलपेक्षा 25 टक्केने जास्त आहे, तर सुनीलचा पगार गणेशपेक्षा किती टक्क्यांनी कमी आहे?

1) 25 टक्के 2) 20 टक्के 3) 30 टक्के 4) यापैकी नाही

89. 25% चा 1/5% = ?

1) $5x10^{4}$ 2) $5x10^{3}$ 3) $5x10^{-4}$ 4) $5x10^{-3}$

90. 1/2, 4/6, 7/10, 10/14, ?/?

1) 12/16 2) 13/17 3) 13/18 4) 14/17

91. एका नावेत सरासरी 22 किलो वजनाची 25 मुले बसली नावाड्यासह सर्वांचे सरासरी वजन 24 किलो झाले, तर नावाड्याचे वजन किती किलोग्रॅम असेल?

1) 72 2) 73 3) 74 4) 75

92. एक मुलगा त्याच्या घरापासून दक्षिणेकडे पाच किलोमीटर जातो तिथून तो पूर्वेकडे 12

किमी जातो, तर तो त्याच्या घरापासून किती किलोमीटर अंतरावर असेल?

1) 17 2) 7 3) 13 4) 10

93. खालील शहरांचा दक्षिण ते उत्तर असा क्रम लावा.

1) मुंबई 2) चेन्नई 3) कोलकाता 4) दिल्ली

1) 3,2,1,4 2) 2,1,3,4 3) 4,3,1,2 4) 1,2,4,3

94. 100 चे 100 टक्के म्हणजे किती?

1) 100 2) 1 3) 200 4) 1000

95. 180, 120, 60, 20, 5, ?

1) 3 2) 2 3) 1 4) 0

96. भिन्न संख्या ओळखा. 8, 9, 16, 36, 100

1) 8 2) 9 3) 16 4) 100

97. जानेवारी महिन्याचे एकूण सेकंद किती?

1) 31,00,000 2) 26,78,400 3) 60,00,000 4) 36,00,000

98. जर TIREDNESS = SLEEP तर HUNGER = ?

1) ANGER 2) DAY 3) FOOD 4) THURST

99. S, M, T, W, T, F, ?

1) S 2) M 3) T 4) W

100. 112 या संख्येचा वर्ग किती आहे?

1) 21342 2) 14211 3) 11241 4) 12544

# उत्तर तालिका

| Q | Ans | Q | Ans | Q | Ans | Q | Ans |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 26 | 2 | 51 | 2 | 76 | 2 |
| 2 | 2 | 27 | 4 | 52 | 3 | 77 | 2 |
| 3 | 4 | 28 | 2 | 53 | 1 | 78 | 2 |
| 4 | 3 | 29 | 3 | 54 | 1 | 79 | 3 |
| 5 | 1 | 30 | 1 | 55 | 1 | 80 | 1 |
| 6 | 2 | 31 | 1 | 56 | 3 | 81 | 3 |
| 7 | 3 | 32 | 3 | 57 | 4 | 82 | 2 |
| 8 | 3 | 33 | 4 | 58 | 4 | 83 | 4 |
| 9 | 4 | 34 | 1 | 59 | 4 | 84 | 1 |
| 10 | 2 | 35 | 2 | 60 | 3 | 85 | 3 |
| 11 | 1 | 36 | 3 | 61 | 1 | 86 | 3 |
| 12 | 3 | 37 | 4 | 62 | 1 | 87 | 1 |
| 13 | 2 | 38 | 1 | 63 | 1 | 88 | 2 |
| 14 | 2 | 39 | 2 | 64 | 3 | 89 | 3 |
| 15 | 3 | 40 | 4 | 65 | 1 | 90 | 3 |
| 16 | 1 | 41 | 1 | 66 | 4 | 91 | 3 |
| 17 | 4 | 42 | 4 | 67 | 2 | 92 | 3 |
| 18 | 2 | 43 | 1 | 68 | 3 | 93 | 2 |
| 19 | 2 | 44 | 3 | 69 | 1 | 94 | 1 |
| 20 | 1 | 45 | 1 | 70 | 1 | 95 | 3 |
| 21 | 3 | 46 | 1 | 71 | 3 | 96 | 1 |
| 22 | 4 | 47 | 3 | 72 | 1 | 97 | 2 |
| 23 | 2 | 48 | 3 | 73 | 1 | 98 | 3 |
| 24 | 3 | 49 | 1 | 74 | 2 | 99 | 1 |
| 25 | 4 | 50 | 4 | 75 | 4 | 100 | 4 |